



Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com






वर्ष ३ रे | अंक : ७३७. वा | शनिवार दि. १३ एप्रिल २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# महायुतीत आठ जागांवर उमेदवार ठरेना, मात्र संयुक्त प्रचाराला सुरुवात,कशी आहे रणनीती?

वृत्तसंस्था/मुंबई

महायुतीमध्ये आणि त्यातही प्रामुख्याने भाजप, शिवसेना यांच्यातील लोकसभेच्या जागावाटपाचा तिढा अद्याप सुटलेला नसला तरी या दोन्ही पक्षांच्या नेतृत्वाने आपापल्या पद्धतीने प्रचार सुरू केला आहे. उमेदवार ठरेल तेव्हा ठरेल, पण प्रचारात आघाडी घेता यावी, यासाठी महायुतीने ठरवून ही संयुक्त प्रचाराची रणनीती आखली आहे. लोकसभा निवडणुकांसाठी तिसऱ्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली तरी अजूनही महायुतीच्या जागांचा तिढा सुटलेला नाही. मुंबईतील दक्षिण मुंबईसह तीन जागा आणि ठाणे, पालघर, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर अशा आठ जागांवर अजूनही महायुतीमध्ये मतैक्य झालेले नाही. उमेदवार जाहीर न झाल्याने साहजिकच प्रचारावरही मर्यादा येणार आहेत. मात्र, भाजप आणि शिवसेनेच्या राज्यातील पक्षनेतृत्वाने त्यावर तोडगा काढताना आपापल्या पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांना मतदारसंघात प्रचार करण्याचे आदेश दिल्याचे समजते.ज्या ठिकाणी इच्छुक उमेदवार आहेत त्यांना मतदारसंघात फिरण्यास सांगण्यात आले आहे. आपलाच उमेदवार आहे, असे समजून पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेणे, निवडणूक लढविण्यासाठी आवश्यक असलेली सर्व तयारी करणे याबाबतही आदेश देण्यात आले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासाठी कमळ चिन्हावर, धनुष्यबाणावर तसेच ज्या ठिकाणी आवश्यक आहे तिथे घड्याळावर मतदान करण्याचेही आवाहन करण्यात येत आहे.दक्षिण मुंबई मतदारसंघासाठी भाजप इच्छुक असून, शिंदेंच्या शिवसेनेनेही या मतदारसंघावर दावा केला आहे. या जागेचा तिढा अद्याप सुटला नसला तरी भाजपकडून राहुल नार्वेकर आणि मंगलप्रभात लोढा आवश्यक त्या भेटीगाठी घेत आहेत. शिवसेनेकडून मिलिंद देवरा मतदारसंघात प्राबल्य असलेल्या समाजाच्या नेत्यांना भेटत आहेत.उत्तर मध्य मुंबईमध्ये विद्यमान खासदार पूनम महाजन यांची उमेदवारी अद्याप भाजपने जाहीर केलेली नाही. मात्र, या ठिकाणी भाजपने प्रचाराला सुरुवात केली आहे. भाजपचे नेते आशीष शेलार यांनी प्रचाराच्या दृष्टीने भेटीगाठी घ्यायला सुरूवात केली आहे. ठाण्यामध्ये अजूनही उमेदवारी जाहीर झालेली नसली तरी मतदारसंघात इच्छुक असलेले शिवसेनेचे रवींद्र फाटक, नरेश म्हस्के प्रचारात उतरले आहेत. याशिवाय भाजपकडून संजीव नाईक हेदेखील मतदारसंघात फिरत आहेत. विशेष म्हणजे अनेक ठिकाणी व्यापाऱ्यांशी संपर्क साधतानाही ज्यांना उमेदवारी मिळेल, त्यांना मदत करा, असेही सांगितले जात आहे.पालघरच्या जागेवर भाजप आणि शिवसेना



असा दोघांचाही आग्रह आहे. ही जागा कोणालाही गेली तरी येथून विद्यमान खासदार राजेंद्र गावित यांनाच उमेदवारी देण्याचे जवळपास निश्चित आहे. त्यामुळे तेच मतदारसंघात फिरत आहेत.रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघाबाबत अद्याप निर्णय झालेला नसला तरी शिवसेनेकडून किरण सामंत आणि भाजपकडून नारायण राणे असे दोघेही निवडणूक प्रचार करीत आहेत. नाशिक लोकसभा मतदारसंघातही विद्यमान खासदार हेमंत गोडसे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते छगन भुजबळ प्रचारात व्यग्र आहेत. शेवटच्या क्षणी महायुतीमधील ज्या पक्षाचा उमेदवार जाहीर होईल, त्या उमेदवारासाठी इतर पक्षाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी कामाला लागायचे आहे, असे आदेशच प्रत्येक पक्षाच्या वरिष्ठांनी दिले आहेत.

---

## ३५ हजाराची लाच घेतांना तहसीलदार सचिन जैस्वालसह दोघे एसीबीची जाळ्यात...

जनसंचलन/ सिंदखेडराजा

येथील तहसीलदार सचिन जैस्वाल यांच्यासह शिपाई पंजाबराव ताठे, तहसीलदाराचे वाहन चालक मंगेश कुलथे यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने तहसील कार्यालयात ३५ हजाराची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार यातील तक्रारदार यांचा वाळू वाहतुकीचा व्यवसाय असून वाळूचा लिलाव झालेला असल्यास ते कायदेशीर परवाना घेवून वाळु वाहतुक करतात. परंतु सध्या वाळू वाहतुकीचा लिलाव झालेला नसून अवैधरित्या वाळु वाहतूक सुरु आहे. तक्रारदार यांना ट्रॅक्टरद्वारे अवैध वाळू वाहतूक सुरु करण्यासाठी यातील आरोपी मंगेश कुलथे यांचेकडून सचिन जैस्वाल तहसीलदार सिंदखेडराजा यांचेकरीता तक्रारदार यांचेकडे एका ट्रॅक्टरसाठी प्रतिमहिना ३५ हजार लाचेची मागणी होत असल्याबाबत तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बुलडाणा यांना दिली होती. त्यानुसार १२ एप्रिल रोजी लाचमागणी पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता मंगेश शालीग्राम कुलथे, पद चालक, तहसील कार्यालय,सिंदखेडराजा यांनी तक्रारदार यांचेकडे सचिन जैस्वाल, तहसिलदार, सिंदखेडराजा यांचेकरिता ३५ हजार रुपये लाच मागणी करुन सदर लाच देण्यासाठी पंजाबराव तेजराव ताठे शिपाई तहसील कार्यालय, सिंदखेडराजा यांनी प्रोत्साहन देवून सचिन शंकरलाल जैस्वाल तहसिलदार, सिंदखेडराजा यांनी सदर लाच रक्कम स्वीकारण्यास संमती देवून सदर लाच रक्कम मंगेश कुलथे यांचेकडे आजच देण्यास सांगीतले. मंगेश कुलथे यांनी तक्रारदार यांना लाच रक्कम घेवून बोलावल्याने १२ एप्रिल रोजी सापळा रचून कारवाई केली असता मंगेश कुलथे यांना तहसीलदाराच्या घरातून ४६.९२ लक्ष रोख रक्कम जप्त तक्रारदार यांचेकडून ३५ हजार रुपये लाच रक्कम स्वीकारतांना रंगेहात पकडण्यात आले आहे. वरील तिनही आरोपी यांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन सिंदखेडराजा येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती. सदर कार्यवाही मारुती जगताप, पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, परिक्षेत्र अमरावती अनिल पवार, अप्पर पो-



लीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, परिक्षेत्र अमरावती श्रीमती शितल घोगरे, पोलीस उपअधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा गजानन शेळके, पोलीस उपअधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, वाशिम यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी सचिन इंगळे, सापळा मदत पथक गजानन शेळके, पोलीस उपअधिक्षक, लाप्रवि वाशिम, पोलीस निरीक्षक, महेश भोसले, पोलीस निरीक्षक, एस आय शाम भांगे, पोहेकाँ प्रविण बैरागी, पोना विनोद लोखंडे, जगदीश पवार, पोकाँ रंजित व्यवहारे, मपोकाँ स्वाती वाणी, चानापोकाँ नितीन शेटे, पोकाँ मधुकर रगड, ॲन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा यांनी पार पाडली.

## लोकसभा निवडणूक; चिखलीत १० लाखांची रोकड जप्त...

जनसंचलन/ चिखली

सर्वत्र आचारसंहिता लागू आहे. या अनुषंगाने रोख, दारू, दागिने आणि इतर मोफत वस्तूंच्या बारीकसारीक हालचालींवर लक्ष ठेवत कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी सर्वत्र पोलिस बंदोबस्तात स्थिर सर्वेक्षण पथक तैनात करण्यात आले. याअनुषंगाने चिखली पोलिसांच्या हद्दीतील मेहकर फाटा येथे एक चेक पोस्ट तैनात आहे. या चेक पोस्टवर एका चारचाकी वाहनातून १० लाख ४८ हजार ६०० रूपये रोख रक्कम जप्त - करण्यात आले आहे. चिखली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मेहकर फाटा पॉईंटवरील निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तैनात असलेल्या चेक पोस्टवर स्थिर सर्वेक्षण - पथकाने १२ एप्रिल रोजी एमएच-४४- एस-५२१२ या वाहनास थांबन तपासणी केली. तपासणीत वाहनाच्या डिक्कीतील एका खाकी रंगाच्या बॅगमध्ये १० लाख ४८ हजार ६०० रुपये रोख आढळून आले. या रकमेबाबत वाहन चालक-मालक पांडूरंग बाजीराव जायभाये (रा. सोनुशी, ता. सिंदखेडराजा) यांच्याकडे विचारपूस केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिल्याने व रोख रकमेबाबत कोणतेही आवश्यक दस्तऐवज सादर न केल्याने पथकाने पंचासमक्ष रक्कम जप्त केली आहे. दरम्यान, जप्त रक्कम सीलबंद पेटीमध्ये ठेवून नायब तहसीलदार तथा नोडल अधिकारी आचारसंहिता कक्ष संतोष मुंडे यांच्या निगराती ठेवण्यात आले आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# प्रचार सोडून महायुतीचे उमेदवार भूमिपुत्र खासदार मा.प्रतापराव जाधव थेट नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर

## शेतकऱ्यांना दिला धीर,मदतीपासून एक ही शेतकरी वंचित राहता कामा नये,अन्यथा गाठ माझ्याशी:- खा.प्रतापराव जाधव यांच्या अधिकाऱ्यां सूचना..!



जनसंचलन/मोताळा

मोताळा तालुक्यातील मौजे वडगांव,अंत्री शिवार व अन्य विविध गावामध्ये अवकाळी पाऊस व गारपीट झाली आहे. लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असल्याने सर्वच उमेदवार प्रचारात व्यस्त आहेत. मात्र या धामधुमीत देखील महायुतीचे उमेदवार तथा भूमिपुत्र खासदार मा.प्रतापराव जाधव यांनी प्रचार बाजूला ठेवून शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी करण्याला प्राधान्य दिले. यावेळी आमदार संजय गायकवाड,भाजपचे नेते .योगेंद्र गोडे, ओमसिंग राजपूत व अन्य महायुतीतील प्रमुख पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते. यावेळी नुकसानीची पाहणी करून खा.जाधव यांनी शेतकऱ्यांना धीर दिला व मदतीसाठी पाठपुरावा करण्याचा शब्द दिला. यावेळी भूमिपुत्र ही उपाधी खा.जाधव यांनी सार्थ ठरवली अशा प्रतिक्रिया उपस्थित शेतकऱ्यांमधून व्यक्त होतांना दिसल्या. खा.प्रतापराव जाधव यांनी पडत्या पावसात सर्वात आधी शेतकऱ्यांच्या बांधावर धाव घेतली होती. केंद्र आणि राज्य सरकारकडे पाठपुरावा करून खा.जाधव यांच्या प्रयत्नातून नोव्हेंबरच्या अतिवृष्टीचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले आहेत.

# डॉ. होमीभाभा परिक्षेत सहकर विद्या मंदिरचा चि. शशांक देवकर याला राज्यस्तरावर सुवर्ण पदक



जनसंचलन/बुलडाणा

मुंबई सायन्स टिचर्स असोसिएशन च्या वतीने घेण्यात आलेल्या डॉ. होमीभाभा बालवैज्ञानिक परीक्षेच्या प्रात्यक्षिक परिक्षेत सहकार विद्या मंदिर, बुलडाणा येथील वर्ग ६ वी चा विद्यार्थी चि. शशांक विलास देवकर यांने घवघवीत यश प्राप्त करीत राज्यस्तरावर सुवर्ण पदक प्राप्त केले. सदर परीक्षा ही तीन स्तरावर घेण्यात येत असते. यामध्ये प्रथम स्तरावरील परीक्षा दि.२१ ऑक्टोबरला लेखी स्वरुपात घेण्यात आली होती. यामध्ये १०० पैकी ८२ गुण घेवून शशांकने विदर्भातून प्रथम क्रमांक प्राप्त केला. तसेच २१ जानेवारी ला झालेल्या प्रात्यक्षीक परीक्षेत सुध्दा त्याने ४४.०६ गुण घेवून विदर्भातून प्रथम येण्याचा मान मिळविला. तृतीय स्तरावरील परीक्षेसाठी त्याने ङ्क म या विषयांतर्गत ङ्क म या विषयावर कृतीसंशोधन करुन दि.११ मार्च रोजी प्रकल्प प्रस्तुत केला व तसेच दि.१७ मार्च रोजी त्या प्रकल्पावर आधारित मौखीक परीक्षा दिली व त्यामध्ये सुवर्ण पदक प्राप्त केले. या त्याच्या यशाबद्दल त्याला दि.०७ एप्रिल रोजी मुंबई येथे सुवर्णपदक व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. चि.शशांकचे अभिनंदन संस्थेच्या अध्यक्षा सौ.कोमल झंवर, प्राचार्य व मुख्याध्यापिका यांनी केले. चि.शशांकनी त्याच्या यशाचे श्रेय संस्थेच्या अध्यक्षा, प्राचार्य, मुख्याध्यापिका व सर्व शिक्षकवृंदांना दिले आहे.

# खुनाच्या गुन्ह्यातील सहा वर्षापासून बेपत्ता आरोपी पोलीसांनी केला जेरबंद

जनसंचलन/सिंदखेडराजा



पोलीस स्टेशन किनगाव राजा अंतर्गत वर्दडी येथील दाखल कलम ३०२ भादंवी खुनाच्या गुन्ह्यातील फरार आरोपी नामे विद्याधर शामसुंदर सोनकांबळे हा गुन्हा घडल्यापासुन गावातुन पोलीसांना चकमा देऊन सहा वर्षापासुन फरार झाला होता. त्याला जेरबंद करण्यासाठी उपविपोअ दे राजा व किनगाव राजा यांच्या संयुक्त कारवाई मा. श्री. सुनिल कडासने पोलीस अधिक्षक साहेब बुलडाणा, मा. श्री. बी बी महामुनी अपर पोलीस अधिक्षक साहेब, बुलडाणा यांचे आदेशाने तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी मनिषा कदम मॅडम, यांचे मार्गदर्शनाखाली व पोलीस स्टेशन किनगाव राजा ठाणेदार विनोद नरवाडे यांचे नेतृत्वात आरोपी शोध बाबत पोलीस स्टेशनला पथक तयार करण्यात आले. फरार आरोपी गावात येत असल्याबाबत गोपनिय माहीती मिळताच गोपनिय माहीतीच्या आधारे पथकातील पोलीस अंमलदार पोहेकॉ विलास काकड उपविपोअ कार्यालय दे राजा नापोकॉ विष्णु मुंढे, पोकॉ शिवाजी बारगजे, पोकॉ मिलींद सोनपसारे, गणेश वारकरी चालक पोकॉ अतिष सवडे यांनी गुन्ह्यातील सहा वर्षापासुन फरार आरोपी विद्याधर शामसुंदर सोनकांबळे वय ३१ वर्ष रा. वर्दडी बु// यास दिनांक ११/०४/२०२४ रोजी ०१/३० वा गुरूवार ला वर्दडी बु गावातील बसटँडवर नाकाबंदी करून ताब्यात घेऊन गुन्ह्यात अटक करण्यात आली.

# जीवनात आलेले संकट पेलण्यासाठी संगीत हे बळ देण्याचं काम करते-प्रा.सौ.टाकळकर

## स्वरविहार संगीत विद्यालयाचा सांज पाडवा उत्साहात संपन्न



जनसंचलन/बुलढाणा

स्वरविहार संगीत विद्यालयाच्या माध्यमातून छोट्या पासून ते मोठ्यांपर्यंत गायन व वादनाचे विद्यार्थी घडविण्याचे कार्य अविरत पद्धतीने सुरू असून जीवनात आलेले प्रत्येक संकट पेलण्यासाठी संगीत हे खूप मोठे बळ देते वेगवेगळ्या आजारांवर सांगीतिक औषधोपचार घेऊन मात करता येते असे प्रतिपादन जेष्ठ संगीतज्ञा प्रा.सौ.किरण टाकळकर यांनी केले आहे. स्वरविहार संगीत विद्यालय हे संगीताचे दर्जेदार प्रशिक्षण देणारी संस्था असल्याचे गौरोद्गार देखील त्यांनी यावेळी काढले. स्वरविहार संगीत विद्यालयाचा सांज पाडवा हा सांगितिक कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला यावेळी त्या बोलत होत्या. सह्याद्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बुलढाणा द्वारा संचालित स्वरविहार संगीत विद्यालय बुलढाणा च्या वतीने स्थानिक हॉटेल द्वारका येथे दिनांक ९ एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजता सांज पाडवा हा सांगितिक कार्यक्रम पार पडला.या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध भूलतज्ञ डॉ. श्रीराम जोशी, जनरल फिजिशियन डॉ.विनायक हिंगणे,बुलढाणा तालुका आरोग्य अधिकारी डॉ.महेंद्र सरपाते, श्री.ओम कोचिंग क्लासेसच्या संचालिका तथा सुप्रसिद्ध गायिका प्रा.सौ रश्मी जाधव, चिकित्सालयीन मानसतज्ञ प्रा.सिद्धार्थ जाधव प्रामुख्याने उपस्थित होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून स्वरविहार संगीत परिवाराच्या सदस्या स्त्रीरोग तज्ञ डॉ.सौ प्रमिला सोळंकी उपस्थित होत्या कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून सुरुवात करण्यात आली त्यानंतर मान्यवरांची यथोचित भाषणे झाली त्यानंतर स्वरविहार संगीत विद्यालयाचे विद्यार्थी अनुक्रमे चि.प्रसेनजीत मोरे,चि.स्वरोम सराफ, चि.मल्हार हिंगणे,कु.अस्मि जोशी, कु.प्रनश्री पडोळ,कु.ओजस्वी जतकर,कु.मनस्वी पवार,डॉ.प्रमिला सोळंकी.डॉ.सौ.पल्लवी जोशी,डॉ.सौ रेणुका हिंगणे,सौ.वैशाली मोरे,सौ. प्रज्ञा सावजी,सौ कल्पना तायडे.सौ साधना चव्हाण.सौ संगीता पोटजावळे, सौ. विमल काळवाघे, सौ छाया गंपले, श्रीमती. लताताई गुर्जर, शैला हिवाळे, सौ.प्रिया गोफणे,वरिष्ठ वैदयकिय अधिकारी डॉ. रवींद्र गोफणे माता व बालसंगोपन अधिकारी डॉ.मिलिंद जाधव आदी स्वरविहारच्या सदस्यांनी वेगवेगळे गीते सादर करून रसिकांची मने जिंकली.तर डॉ महेंद्र सरपाते यांनी आपल्या मिमिक्री च्या माध्यमातून गायन वादनाचे धडे घेण्यासाठी स्वरविहार संगीत विद्यालयात आपण प्रवेश घेतला पाहिजे असे आवाहन केले यावेळी प्रेक्षकांमध्ये एकच हसा पिकला. सदर मैफीलीसाठी तबल्यावर प्रा.अमोल दिशागज, ढोलक वर मुकुल मोरे, सिंथेसाईझर वर विजयसिंह राठोड,ऑक्टोपॅड वर आनंद अंभोरे यांनी साथ दिली तर मैफिलीची सांगता स्वरविहार संगीत विद्यालयाचे संचालक प्रा.रविकिरण मोरे यांनी ङ्कङ्कअंदाज आरशाचा वाटे खरा असावा बहुतेक माणसाचा तो चेहरा असावाङ्कङ्क ही गझल सादर करून केली. सदर मैफिलीचे सूत्रसंचालन सुप्रसिद्ध होमिओपॅथी तथा आहार तज्ञ डॉ.सौ पल्लवी जोशी व साहित्याच्या गाढया अभ्यासिका प्रा.सौ.साधना चव्हाण यांनी केले तर डॉ. रवींद्र गोफणे यांनी आभार प्रदर्शन केले यावेळी स्वरविहार संगीत विद्यालयाचे सर्व विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मॉडेल डिग्री कॉलेज बुलढाणा येथे महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी

**जनसंचलन/बुलडाणा**

गाडगे बाबा अमरावती विद्यापिठअमरावती द्वारा संचालीत मॉडेल डिग्री कॉलेज बुलढाणा येथे महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. मॉडेल डिग्री कॉलेजचे मानद संचालक डॉ.अण्णा साहेब म्हळसने हे कार्यक्रमांचे अध्यक्ष होते.या कार्यक्रमात प्रा.शीला दाभाडे यांनी आपले विचार व्यक्त करताना, विद्येविना मती गेली,मती विना नीती गेली.नीती विना गती गेली,गती विना वित्त गेले,वित्त विना शूद्र खचले,इतके अनर्थ एका अविद्येने केले. महात्मा फुले यांनी प्रथम सावित्रीबाई फुले यांना सुशिक्षित केले. केवळ त्यांच्यामुळेच आज मुली व महिला सर्वच क्षेत्रांत काम करतांना दिसून येत आहे तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांन ची समाधी शोधून काढली व तेव्हापासून छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी केली जात आहे व महात्मा ज्योतिबा फुले यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर प्रथम पोवाडे लिहिले आहे. असे विचार प्रा.शीला दाभाडे(रोकडे)यांनी व्यक्त केले. तसेच प्रा.देशमुख,प्रा.इगळे,प्रा.



रिंढे,यांनी आपले विचार व्यक्त केले. तसेच प्रा.भादक्कर,प्रा.गायकी,प्रा. गोडबोले,प्रा.प्रेरणा पाटिल,प्रा. वडाले,तसेच सर्व विद्यार्थी व प्राध्यापक वृद मोड्या संख्येने उपस्थित होते..

# महिलेच्या गळ्यातील चैनीला लावला रंग, नंतर स्वच्छ करून देतो म्हणत घरात शिरला आणि...!

## लोणार शहरातील एका महिलेसोबत विचित्र घटना घडली...

**जनसंचलन/ लोणार**

लोणार शहरातील एका महिलेसोबत एक विचित्र प्रकार घडला आहे. सेल्समन असल्याचे सांगून भांडी स्वच्छ करण्याची पावडर विक्रेत्याने महिलेला चांगलाच गंडा घातला. आधी गळ्यातील चैनीला रंग लावला नंतर साफ करून देतो असे म्हणत तो घरात शिरला, त्याच्यामागे पुन्हा एक जण घरात आला. आणि स्वच्छ करून देण्याच्या नावाने दोघा अज्ञातांनी ३ तोळ्याची, सोन्याची चैन लंपास केली. अश्या प्रकारे फसवणूक केल्याची तक्रार महिलेने लोणार शहर पोलीस ठाण्यात मंगळवारी दिली आहे. सुशीला संचेती असे फिर्यादी महिलेचे नाव आहे. सोमवारी ८ एप्रिल रोजी, दुपारी १:३० वाजेच्या सुमारास त्या घरासमोर बसल्या होत्या. तितक्यात एक अनोळखी व्यक्ती समोर आला आणि भांडी धुण्याची पावडर विकत घ्या असे म्हणाला. परंतु त्यांनी नकार दिला. कंपनीचे प्रॉडक्ट आहे आम्ही सेल्समन आहोत, असे म्हणत त्या व्यक्तीने त्यांच्या गळ्यातील चैनीला हात लावत रंग लावला, रंग का लावला असे विचारले असता, साफ करून देतो असे त्याने म्हटले. आणि घरात शिरला..त्यावेळी त्याच्या पाठीमागून त्याचाच एक सहकारी सुद्धा दहा ते पंधरा मिनिटांनी घरात आला होता. इन्हंतुम्हाला डेमो करून दाखवतो,रंग लावलेली चैन कशी चमकते तुम्ही बघाच असं म्हणून त्याने एका पातेल्यात चैन टाकायला लावली. त्यामध्ये पाणी व हळद टाकून पाणी गरम करायचे सांगितले, यावेळी घरामध्ये फिर्यादी सुशीला संचेती यांच्यासह त्यांची सून प्रीती ह्या देखील उपस्थित होत्या. दोघींच्या डोळ्यासमोर तीन तोळे सोन्याची चैन पातेल्यात टाकण्यात आली. पाणी थोडे गरम आहे, थोड्यावेळाने त्यामधून चैन काढा असे सांगून दोघेजण घराबाहेर




पडले. इकडे सासू सुनेला काहीही समजलं नव्हतं. थोड्यावेळाने पातेल्यात हात टाकून चैन पहिली तर त्यांना दिसून आली नाही. यावेळी आपली तीन तोळे सोन्याची चैन, ६७ हजार रुपयांची लंपास झाल्याचे त्यांना लक्षात आल्यांनतर दोघी घराबाहेर येऊन गल्लीत त्या दोघा व्यक्तींचा शोध घेऊ लागल्या, परंतु ते कुठेही आढळले नाही. अशा पद्धतीने दोघा आज्ञातांनी फसवणूक केल्याची तक्रार सुशीला संचेती यांनी लोणार शहर पोलीस ठाण्यात नोंदविली. पोलिसांनी अज्ञाता विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# देव्हारीला अवकाळी पावसाचा तडाखा जयश्रीताई शेळके यांनी केली नुकसानाची पाहणी

**जनसंचलन/बुलडाणा**

तालुक्यातील देव्हारी येथे १२ एप्रिल रोजी दुपारी वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे मोठ्या प्रमाणात घरांचे नुकसान झाले. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या सचिव जयश्रीताई शेळके यांनी देव्हारी गावाला भेट देऊन नुकसानाची पाहणी केली. तसेच जिल्हाधिकाऱ्यांना संपर्क करून नुकसानग्रस्तांना मदत देण्याची मागणी केली.

गेल्या दोन दिवसांपासून जिल्ह्यात अनेक ठिकाणी अवकाळी पावसाने थैमान घातले आहे. गुरुवारी मलकापूर व खामगाव तालुक्यात जोराचा पाऊस, गारपीट झाली. तर शुक्रवारी मोताळा तालुक्यात मोठ्या प्रमाणात गारपीट झाली. शेतीपिकांना अवकाळीचा प्रचंड फटका बसला. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. शुक्रवारी दुपारी बुलडाणा तालुक्यातील देव्हारी येथे अवकाळी



पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे मोठे नुकसान झाले. विजेचे खांब तुटून पडल्याने देव्हारीत अंधार पसरला होता. सुदैवाने कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नाही.

# कर्जबाजारीपणामुळे अत्यंत विषारी औषध प्राशन केल्याने शेतकऱ्याचा मृत्यू...

**जनसंचलन/नांदुरा**

सरकारचे शेतकऱ्यांविषयीचे आडमुठी धोरण व निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकरी नेहमी चिंताग्रस्त असतो. व कित्येक शेतकरी कर्जबाजारी होऊन आपली जीवनयात्रा संपवितात.याचे ताजे उदाहरण म्हणजे बंडू पाटील. नांदुरा तालुक्यात गेल्या महिन्याभरापूर्वी निसर्गाच्या कोपामुळे शेतपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले.गारपीट व चक्रीवादळामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावल्या गेला.कृषी विभाग तहसील विभागाने पंचनामे केले पण कुठलीही मदत मिळाली नाही.घरी मुलीचे लग्न व संपूर्ण शेत पीक उध्वस्त झाल्यामुळे नांदुरा तालुक्यातील शेतकरी रवींद्र मुरलीधर कोळस्कार उर्फ बंडु पाटील यांनी तणावात येऊन शेतातील विषारी औषध प्राशन करून आपले जीवन संपविले.याबाबत सविस्तर असे की १५ फेब्रुवारी रोजी आलेल्या चक्रीवादळ व गारपिटीमुळे बंडू पाटील यांच्या शेतातील संपूर्ण २ एक्कर मका हा भुईसपाट झाला.यातच बंडू पाटील यांच्यावर बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेचे १ लाख रुपयांचे कर्ज होते.आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने व सततच्या नापिकीमुळे कर्ज भरू न शकल्याने बँकेचे अधिकारी नेहमी नेहमी वसुलीसाठी त्रास देत असत.अशातच मुलीचे लग्न अवघ्या एका महिन्यावर येऊन ठेपले.लग्नाची तारीख २२ मे २०२४ व शेतात डौलात उभा असलेला मका ज्या भरवशावर लग्न करण्याचे योजिले तो मका गारपीट व चक्रीवादळामुळे एका रात्रीत भुईसपाट झाला.उपजीविकेचे एकमेव साधन असलेल्या शेती व शेतपिकाचे झालेले नुकसान या सर्व बाबींचा मनस्ताप होऊन शेवटी बंडू पाटील यांनी आपली जीवनयात्रा संपविली निर्णय घेऊन दिनांक ९ मार्च २०२४ रोजी मन पक्क करून सायंकाळी शेतात गेले व शेतात असलेले अत्यंत विषारी कीटकनाशक औषध प्राशन केले.ही घटना माहिती होताच बंडू पाटील यांना तातडीने नांदुरा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे दाखल करण्यात आले.येथे वैद्यकीय अधिकारी डॉ. जैस्वाल यांनी पोटातील सर्व विषारी औषध काढले परंतु तोपर्यंत ते औषध रक्तात भिनले होते.यकरणामुळे डॉ. जैस्वाल साहेबांनी त्यांना तातडीने खामगाव येथे पाठविले परंतु येथेही तब्बेत बिघडल्यामुळे रात्री अडीच वाजता अकोला येथे हलविण्यात आले.येथे अतिदक्षता विभागात उपचार सुरू होते परंतु अखेर बंडू पाटील यांनी १५ मार्च रोजी सकाळी ६ वाजता अखेरचा श्वास घेतला व मृत्यूशी सुरू असलेली झुंज अखेर संपली व संपूर्ण तालुक्यावर शोककळा पसरली. सुस्वभावी,सर्वांशी हसतमुखाने वागणारा, प्रेमळ स्वभावाचा घरातील कर्ता पुरुष असलेला बंडू पाटील हे जग सोडून निघून गेला.शासन व प्रशासनाने शेतकऱ्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभ राहण्याची आज नितांत गरज आहे. अन्यथा जगाचा पोशिंदाच शिल्लक राहणार नाही...

# न्यायालयातील केस मागे घेण्यासाठी एकास केली मारहाण...

**जनसंचलन/ खामगाव**

न्यायालयात सुरू असलेली केस मागे घेत नाही, म्हणून एकास चापटाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. तसेच अश्लील शिवीगाळ करण्यात आली. बुधवारी सायंकाळी ही घटना खामगाव तालुक्यातील शेलोडी येथे घडली. तक्रारीनुसार, गणेश ओंकार डांगे (२९) याने आकाश राऊत याच्याविरोधात पोलिस स्टेशनमध्ये यापूर्वी तक्रार दिली होती. या तक्रारीवरून राऊत विरोधात गुन्हा दाखल असून, प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. दरम्यान, या प्रकरणावरून आकाश राऊत वारंवार वाद उकरून काढतो. अश्लील शिवीगाळ करीत असल्याची धमकी देत असल्याचा आरोप गणेश डांगे याने तक्रारीत केला. गणेश डांगे व त्याची आई बुधवारी सायंकाळी आपल्या दारासमोर उभे असताना आकाश व त्याची पत्नी मंदा हे दोघे गणेशच्या दारी आले आणि न्यायालयातील केस मागे घेण्यासाठी दबाव टाकला. यावेळी केस मागे घेण्यास विरोध केला असता आकाशने चापटाबुक्क्यांनी मारहाण केली. तर काही तरी वस्तू मारून जखमी केले. तर आकाशची बायको मंदा हिने मारहाण केली. या वादामुळे आपला मुलगा आणि पत्नी घाबरल्यामुळे त्यांना उपचारासाठी अकोला येथे हलविण्यात आल्याचेही तक्रारीत नमूद केले. याप्रकरणी तक्रारीवरून खामगाव ग्रामीण पोलिसांनी आकाश राऊत व मंदा राऊत यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास खामगाव ग्रामीण पोलिस करीत आहे.

# ज्येष्ठ नागरिक, दिव्यांगांच्या घरून मतदानाला २१ एप्रिल पासून सुरूवात...

## नोंदणी केलेल्यांनाच सुविधा मिळणार...

## मतपत्रिकेद्वारे मतदानाची सुविधा...




जनसंचलन/बुलढाणा

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक आणि सर्व दिव्यांग व्यक्तींनी मागणी नोंदविल्यानुसार घरून मतदान करण्याची सुविधा देण्यात येणार आहे. त्यानुसार जिल्ह्यात २ हजार १७१ ज्येष्ठ नागरिक आणि ६९२ दिव्यांग असे एकूण २ हजार ८६३ मतदार घरून मतदान करणार आहेत. हे मतदान मतपत्रिकेद्वारे होणार असून लोकसभा मतदारसंघात १०१ पथक प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन मतदान करून घेणार आहे. जिल्ह्यात दि. २१ ते २३ एप्रिल २०२४ दरम्यान सदर मतदान प्रक्रिया होणार आहे. बुलडाणा विधानसभा मतदारसंघात ११२ ज्येष्ठ नागरिक, ८४ दिव्यांग असे १९६, चिखली विधानसभा मतदारसंघात ३१८ ज्येष्ठ नागरिक, ९६ दिव्यांग असे ४१४, सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघात ५३९ ज्येष्ठ नागरिक, ८९ दिव्यांग असे ६२८, मेहकर विधानसभा मतदारसंघात ८२० ज्येष्ठ नागरिक, २८३ दिव्यांग असे १ हजार १०३, खामगाव विधानसभा मतदारसंघात १२० ज्येष्ठ नागरिक, ८३ दिव्यांग असे २०३, जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघात २६२ ज्येष्ठ नागरिक, ५७ दिव्यांग असे ३१९, असे २ हजार १७१ आणि दिव्यांग ६९२ असे एकूण २ हजार ८६३ मतदार घरून मतदान करणार आहे. ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग मतदार असलेल्या बुलडाणा विधानसभा मतदारसंघ येथे १९६ मतदारांसाठी १० पथक, चिखली येथे ४१४ मतदारांसाठी २० पथक, सिंदखेड राजा येथे ६२८ मतदारांसाठी १९ पथक, मेहकर येथे ११०३ मतदारांसाठी ३२ पथक, खामगाव येथे २०३ मतदारांसाठी १० पथक, जळगाव जामोद येथे ३१९ मतदारांसाठी १० पथक, असे एकूण १०१ पथक दि. २१ एप्रिलपासून घरोघरी जाऊन मतदान प्रक्रिया राबवणार आहे. यावेळी प्रथम ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्तींना घरून मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पथकामध्ये नियुक्त मतदान अधिकारी, पोलिस आणि उमेदवारांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत मतपत्रिकेद्वारे मतदानाची प्रक्रिया पार पाडल्या जाणार आहे. मतदान केंद्रावरील मतदानाच्या पद्धतीनेच मतदान करण्यात येणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेचे टिमकडून चित्रीकरण केले जाणार आहे. अंध व्यक्तींसाठी मतदान करताना विशेष सोय करण्यात आली आहे. निवडणुकीत २१ उमेदवार आणि १ नोटा असल्याने दोन मतदान यंत्र निवडणुकीत असणार आहे. एका मतदान यंत्रावर १६ उमेदवार आणि उर्वरीत उमेदवार दुसऱ्या मतदान यंत्रावर असणार आहे. अंध व्यक्तींसाठी ब्रेल लिपीत सुविधा असणार आहे. तसेच डमी मतपत्रिका राहणार आहे. त्यावर उमेदवारांचे क्रमांक राहणार आहे. सदर क्रमांक मतदान यंत्राच्या बाजूला ब्रेल लिपीत असणार आहे. ज्या उमेदवाराला मतदान करावयाचे आहे, तो ब्रेल लिपीतील क्रमांक तपासून बाजूच्या निळे बटन दाबून मतदान करावे लागणार आहे. आवश्यकता भासल्यास अंध व्यक्तींना मदतनीस देण्यात येणार आहे. दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांच्या मदतीसाठी सक्षम ॲप विकसित करण्यात आले आहे. दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांना मतदान केंद्रावर येऊन मतदान करावयाचे आहे, परंतू त्यांच्याकडे वाहतुकीची सोय नाही, तसेच मतदान केंद्रावर व्हील चेअरची सोय हवी आहे, अशांनी या सक्षम ॲपद्वारे नोंदणी करावी लागणार आहे. त्यानुसार त्यांना मदतनीसासह सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहे. दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यामुळे या घटकाने पुढे येऊन मतदान करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# अंगणवाडीताईंचे आवाहन, चला करूया मतदान...

## महिलांनी मतदानाचे कर्तव्य पार पाडावे- मुख्य कार्यकारी अधिकारी बी.एम.मोहन





जनसंचलन/बुलढाणा

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांनी पुढे येऊन आपल्या मतदानाचे कर्तव्य पार पाडावे, तसेच लोकशाहीच्या उत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. एम. मोहन यांनी केले आहे. लोकसभा निवडणूक २०१९ पेक्षा अधिक मतदान व्हावे आणि मतांचा टक्का वाढावा, यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने सुनियोजित मतदार शिक्षण व निवडणूक सहभाग कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून प्रत्येक कुटुंबापर्यंत मतदानाचा संदेश पोहोचविण्यासाठी आणि मतदार जाणीव जागृतीच्या उद्देशाने जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात विविध उपक्रमांच्या माध्यमातून मतदार जाणीव जागृतीविषयक अंमलबजावणी करण्यात येत आहे. येत्या दि. २६ एप्रिल रोजी जिल्ह्यातील १ हजार ९६२ मतदान केंद्रावर बुलढाणा लोकसभा मतदारसंघासाठी मतदान होणार आहे. त्या अनुषंगाने मतदारांनी विशेषत: नवमतदार, महिला, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांनी लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होऊन मतदानाचे कर्तव्य पार पाडावे, यासाठी व्यापक जाणीव-जागृती करण्यात येत आहे. जिल्ह्यात एकूण ९ लाख ८० हजार ८७० महिला मतदार आहेत. तर स्त्री-पुरुष मतदार गुणोत्तर हे ९१० आहे. सन २०१९च्या लोकसभा निवडणूकीत सरासरी ६३.५४ टक्के मतदारांनी आपले कर्तव्य पार पाडले होते. आगामी लोकसभा निवडणुकीत सुद्धा महिलांनी मोठ्या प्रमाणावर मताधिकार बजवावा, यासाठी मतदार जाणीव-जागृतीविषयक उपक्रमांच्या माध्यमातून लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. त्यासाठी जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर मतदानकेंद्र जागृती समूह स्थापित करण्यात आले आहेत. तसेच सर्व शासकीय व निमशासकीय विभागांतर्गत मतदार जागृती मंचही स्थापित करण्यात आले आहेत. दरम्यान याच उद्देशाने आज महिला व बाल विकास विभागातर्फे महिलांच्या मतदानाचा टक्का वाढविणे आणि महिला मतदारांना प्रेरीत करण्यासाठी अंगणवाडी ताईंच्या माध्यमातून सर्व तालुक्यात गो वोट चला जाऊया मतदानालाच्या जागर करण्यात आला आहे. जिल्हा मुख्यालयी जिल्हा परिषदेमध्ये आयोजित कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. एम. मोहन, महिला व बाल कल्याण विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद एंडोले, सिंचन विभागाचे कार्यकारी अभियंता विशाल पिंपळे, जिल्हा पशूसंवर्धन अधिकारी अशोक लोणे, पंचायत विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी संजय इंगळे, बाल विकास प्रकल्प अधिकारी संदिप गवळी आदी उपस्थित होते. जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी ताईंनी आपल्या कार्यक्षेत्रातील महिलांना मतदानाचे कर्तव्य पार पाडण्यासाठी प्रोत्साहित करावे, तसेच जिल्ह्यातील सर्व महिला मतदारांनी निर्भयपणे आपला मताधिकार बजावावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी बी. एम. मोहन यांनी केले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958